वर्ष-०८ अंक-१४ मुंबई, मंगळवार २२ ते २८ फेब्रुवारी २०२२ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2
म्हाडा पेपर फुटीप्रकरणी आणखी एका दलालाच्या पुणे सायबर पोलिसांनी आवळल्या मुसक्या; तपासाला वेग

3 → डॉक्टर गजाआड,दोघांचा शोध

एकाचवेळी तीन मुलांचा शेत तळ्यात बुडून मृत्यू! ← 4

## स्वस्तात सोने देण्याच्या नावाखाली दहा लाखांचा दरोडा

# असा लावला जायचा ट्रॅप



अहमदनगर: स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने बाहेरच्या जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना गोड बोलून नगर जिल्ह्यात बोलावायचे. निर्जन ठिकाणी नेऊन त्यांच्यावर हल्ला करायचा आणि पैसे घेऊन पळून जायचे, असे गुन्हे नगर जिल्ह्यात सरार्स घडतात. तरीही अनेक जण याला बळी पडतात. कर्जत (जि. रायगड) येथील एका बांधकाम व्यावसायिकालाही अशाच पद्धतीने सुमारे दहा लाखांना लुटण्यात आले. अशा गुन्ह्यातील आरोपी शक्यतो सापडत नाहीत, मात्र नगर जिल्ह्यातील कर्जत पोलिसांनी यातील एका आरोपीला शिताफीने अटक केली.

...पान २ वर...

### अशी होते फसवणूक...

*आरोपी फसवणूक कशी करतात, याबद्दल पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी सांगितले की, या भागात अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या टोळ्या आहेत. बाहेरच्या जिल्ह्यातील व्यावसायिकांना शोधून, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना अशा पध्दतीने लुबाडले जाते. महामार्गाचे काम सुरू असताना खोदकामात सोने सापडले, जुन्या वाड्यात सोने सापडले ते स्वस्तात विकायचे आहे, अशी कारणे सांगून चोरटे विश्वास संपादन करतात. अनेकदा सुशिक्षित मंडळीही त्यांच्या बोलण्याला फसल्याचे आढळून येते. त्यामुळे अशा गोष्टींवर आणि कोणतीच गोष्टी स्वस्तात मिळतेय यावर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही यादव यांनी केले आहे.*

## खेळण्यासाठी घराबाहेर पडले, ते परत आलेच नाहीत

# एकाचवेळी तीन मुलांचा शेत तळ्यात बुडून मृत्यू!



औरंगाबाद: खेळण्यासाठी घराबाहेर पडलेल्या तीन मुलांचा शेत तलावात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना औरंगाबादच्या दौलताबाद भागातील शरणापूर परिसरातील घडली आहे. प्रतीक भिसे (वय १५), तिरुपती उदळकर (१७), शिवराज पवार (१६) अशी मुलांची नावं आहेत. तीनही मुलं रविवारपासून बेपत्ता होती तर याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिसांत याप्रकरणी बेपत्ता असल्याची सुद्धा नोंद करण्यात आली होती. मिळालेल्या माहितीनुसार, शेत तळ्यात बुडालेली तीनही मुलं वाळूज येथील सारा संगम सोसायटीच्या बजाज नगर येथील रहिवासी आहेत. रविवारी सायकल घेऊन तीनही मुलं दुपारी एक वाजेपासून घराबाहेर पडली होती. मात्र रात्रीपर्यंत घरी तीनही मुलं परत न आल्याने त्यांची शोधाशोध सुरु होती. दरम्यान, आज तीनही मुलांचा मृतदेह शरणापूर येथील शेत तळ्यात सापडला आहे.

### घटनास्थळी बघ्यांची गर्दी.....

शरणापूर येथे शेततळ्यात तीन मुलांचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचं कळताच घटनास्थळी मोठी गर्दी पाहायला मिळाली. तर घटनेची माहिती मिळताच दौलताबाद पोलिसांनी धाव घेत मुलांचे मृतदेह पाण्याबाहेर काढून घाटी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवले.

## टिटवाळ्यावरून वाशीला जीव द्यायला आला! नोकरी नसल्यानं पुलावरून उडीही टाकली आणि

नवी मुंबई : वाशी खाडी पुलावरुन उडी टाकून आत्महत्याचे प्रयत्न करणाचे प्रकार वारंवाड घडताना दिसतात. असाच प्रकार पुन्हा एकदा घडला होता. एका तरुणानं वाशी खाडी पुलावरुन उडी टाकत आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला. पण सुदैवानं हा तरुण बचावला आहे. स्थानिक मच्छिमारांनी दाखवलेल्या प्रसंगावधानामुळे या तरुणाचा जीव वाचला आहे. यानंतर या तरुणाला पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलं. पोलिसांच्या चौकशीत ...पान २ वर...



## अखेरपर्यंत मैत्री निभावली, सुप्रिया शिंदे खून प्रकरण, मैत्रिणींमुळे आरोपीचा सुगावा

डोंबिवली : डोंबिवलीतील दावडी परिसरात राहत्या घरातील सोफा-कम-बेडमध्ये मृतदेह आढळलेल्या विवाहितेच्या हत्या प्रकरणाचे गूढ अवघ्या काही तासांत उकलले. मात्र 33 वर्षीय सुप्रिया शिंदे यांच्या खुनाचा गुंता सोडवण्यात त्यांच्या चार जवळच्या ...पान २ वर...




## मराठीला अभिजात दर्जाच्या मागणीची 4 हजार पोस्ट कार्ड्स राष्ट्रपतींकडे रवाना

# मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत संच रवाना



मुंबई : मराठी भाषेला "अभिजात" भाषेचा दर्जा मिळावा मागणीची 4 हजार पोस्ट कार्डस आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत रवाना करण्यात आले. याप्रसंगी वर्षा शासकीय निवासस्थानी मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई खासदार अरविंद सावंत उपस्थित होते. मराठी भाषेला "अभिजात" दर्जा प्राप्त व्हावा यासाठी मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई यांच्या नेतृत्वाखाली एक जन अभियान सुरू करण्यात आले आहे. हा "अभिजात" दर्जा 27 फेब्रुवारी 2022 रोजी मराठी भाषा दिवस आहे. त्याआधी मिळावा, यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून आज मुख्यमंत्री ठाकरे यांच्या हस्ते सुमारे 4 हजार पोस्ट कार्ड्स राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांना पाठविण्यात आली. हा पोस्ट कार्ड्स पाठविण्याचा दुसरा संच आहे, याआधी सुद्धा एक संच राष्ट्रपती महोदयांना पाठविण्यात आला आहे.

### सुभाष देसाई उद्या केंद्रीय मंत्र्यांना भेटणार

सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली एक जनअभियान सुरु करण्यात आलेले आहे. "अभिजात" दर्जा मिळावा यासाठी सर्व क्षेत्रातील मान्यवर एकटवले आहेत आणि या जनअभियानात सहभागी झालेले आहेत. अनेक वर्षे प्रलंबित असलेला हा प्रश्न आता शेवटच्या टप्प्यात येऊन ठेपलेला आहे. मराठी भाषेला तात्काळ "अभिजात" दर्जा मिळण्याचा प्रश्न पूर्णत्वास नेण्यासाठी उद्या सोमवारी 21 फेब्रुवारी रोजी मराठी भाषा मंत्री सुभाष देसाई हे केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल आणि जी. कृष्णा रेड्डी यांची भेट घेणार आहेत. दरम्यान "आवश्यक असल्यास पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्याशी देखील आपण दूरध्वनीवरून संपर्क साधणार आहोत. मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यासाठी आग्रहाची विनंती करणार आहोत, अशी माहिती यावेळी सुभाष देसाई यांनी दिली.

# गुजराती गायिकेवर नोटांची उधळण, विरारमधील धार्मिक कार्यक्रमात प्रकार



विरार : गुजराती समाजाच्या धार्मिक कार्यक्रमात नोटा उधळल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रसिद्ध गुजराती गायिकेवर लाखो रुपयांच्या नोटा भिरकावल्याचा दावा केला जात आहे. विरारमध्ये धार्मिक कार्यक्रमात पैशांचा पाऊस पाडल्याचं चित्र पाहायला मिळालं. गायिका गाणं गात असताना ताल धरत तिच्या अंगावर शेकडो जणांनी नोटांचे बंडलच्या बंडल उधळल्याची माहिती आहे. नोटांचे बंडल उधळतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. तर दुसरीकडे विरार पोलिसांना याची थोडीसुद्धा कल्पना नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. स्वयंचैतन्य शक्तीपीठ आनंद धाम गोशाळाच्या माध्यमातून विरार पूर्वेकडील रायपाडा परिसरातील गोशाळेत हा कार्यक्रम झाला होता. 19 फेब्रुवारी रोजी शनिवारी रात्री 9:30 ते पहाटे 4 वाजेपर्यंत हा कार्यक्रम पार पडला असल्याची माहिती समोर आली आहे. व्हिडीओमध्ये काय दिसते राजस्थानमधील प्रसिद्ध गायिका कच्छ कोकिळा गीताबेन रबारी, संतवणी आराधक गोविंदभाऊ गाढवी, लोकसाहित्यिकार प्रतापदान गाढवी यांच्या गाण्याचा हा धार्मिक कार्यक्रम होता. गाणे चालू असताना एकामागून एक जण येऊन पैशाची उधळण करत असतानाचे व्हिडीओमध्ये दिसत आहे. वसई-विरारसह मीरा भाईंदर, पालघर, मुंबई, ठाणे, गुजरात आणि महाराष्ट्राच्या विविध भागातून हजारो गुजराती नागरिकांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती.



### स्वस्तात सोने दण्याच्या

त्याच्याकडून टोळीचे कारनामे उघड होत आहेत. कर्जत तालुक्यातील कोंभळी फाटा येथे ९ फेब्रुवारी २०२२ रोजी अशीच एक घटना घडली होती. आरोपींच्या टोळीने त्यांच्या पद्धतीनुसार बांधकाम व्यावसायिक संतोष रामचंद्र घुडे, (वय ४३, रा. आंबिवली ता. कर्जत, जि. रायगड व त्यांचा मित्र यांना स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखविले. टोळीतील एक साथिदार विठ्ठल जाधव (खरे नाव माहीत नाही) यांनी त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी सोने घेण्याची तयारी दर्शविताच त्यांना नगर-सोलापूर रोडवर कोंभळी फाट्याजवळील शेतात पैसे घेऊन बोलाविले. त्यांच्यावर विश्वास ठेवून घुडे व त्यांचा मित्र तेथे आले. तेव्हा तेथे दबा धरून बसलेल्या दहा ते बारा जाणांच्या टोळीने त्यांच्यावर हल्ला केला. घुडे यांना लाकडी दांड्याने मारहाण केली. त्यांच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकून त्यांच्याकडील दहा लाख रुपये व तीन मोबाईल हँडसेट असा दहा लाख, १८ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन आरोपी पळून गेले. घुडे यांनी कर्जत पोलिस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली. त्यानुसार दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करताना कर्जतचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी आरोपींची माहिती मिळविण्यास सुरवात केली. तेव्हा त्यांना सचिन आल्या पवार (रा. राक्षसवाडी ता. कर्जत) याच्याबद्दल माहिती मिळाली. तो कुळधरण परिसरात असल्याचे समजल्यावर पोलिसांचे पथक तेथे गेले. तेथे आरोपीला अटक केली. त्याच्याकडे विचारपूस केल्यावर त्याने गुन्ह्याची आणि साथिदारांचीही माहिती दिली. त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी मिळाली असून साथिदारांचा शोध सुरू करण्यात आला आहे. पोलिस उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे, अमंलदार अंकुश ढवळे, सुनील चव्हाण, पांडुरंग भांडवलकर, शाम जाधव, सुनील खैरे, महादेव कोहक, गोवर्धन कदम यांच्या पथकाने ही कामगिरी केली.

### टिटवाळ्यावरुन वाशीला जीव द्यायला आला!

या तरुणानं आत्महत्येचं टोकाचं पाऊल का उचललं होतं, याचाही उलगडा झाला आहे. कोरोना महामारीत करण्यात आलेल्या लॉकडाऊनचा फटका अनेकांना बसला. हा तरुणही त्याला अपवाद नव्हता. या तरुणाची आर्थिक परिस्थिती खालावली होती. कोरोना महामारीचा फटका बसलेल्या या तरुणाला नैराश्य आलं होतं. नोकरी मिळत नसल्यानं निराश झालेल्या या तरुणानं आत्महत्येचं टोकाचं पाऊल उचललं होतं. टिटवाळ्यावरुन वाशीला जीव द्यायला आला! आत्महत्या करण्याचा प्रयत्न केलेल्या या तरुणाचं नाव मुख्तार खान असं आहे. तो टिटवाळा इथं राहाणार आहे. या तरुणानं वाशी खाडी पुलावरुन उडी टाक आपलं आयुष्य संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र सजग मच्छिमारांनी तत्काळ या तरुणाच्या दिशेनं धाव घेतली. यानंतर बोटीच्या मदतीनं या तरुणाला वाचवण्यात आलं. स्थानिक मच्छिमार बांधव आणि नवी मुंबई पोलिसांनी तत्काळ मदत केल्यामुळे या तरुणाचा जीव वाचला आहे. तरुणाची चौकशी सुरु नोकरी मिळत नसल्यामुले मुख्तार खान याला नैराश्य आलं होतं. लॉकडाऊनमुळे शिक्षणाचा आधीच खेळखंडोबा झाला होता. त्यात नोकरी नाही, म्हणून या तरुणाचं जगणं मुश्किल झालं होतं. आर्थिक ओढाताण, भविष्याची चिंता यामुळे बेहाल झालेल्या मुख्तारनं टोकाचा निर्णय घेत नवी मुंबईतल्या वाशी खाडी पुलावरुन उडी टाकली. सुदैवानं त्याचा जीव वाचला असून आता नवी मुंबई पोलिसांनी या तरुणाला ताब्यात घेतलं आहे. या तरुणाची पोलिसांकडून चौकशी सुरु आहे. आत्महत्या रोखण्याचं आव्हान नवी मुंबईचा खाडीपूल हा आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यांसाठी कुप्रसिद्ध ठरत चालला आहे. अशा घटना रोखण्याचं आव्हान पोलिसांसमोर आहेच. शिवाय अशा घटना घडू नयेत, यासाठी सातत्यानं पोलिसही या ठिकाणी तैनात असतात. मात्र तरिदेखील वाशी खाडी पुलावरुन उडी टाकून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्यांना रोखायचं कसं, हा प्रश्नही कायम आहे.

# म्हाडा पेपर फुटीप्रकरणी आणखी एका दलालाच्या पुणे सायबर पोलिसांनी आवळल्या मुसक्या ; तपासाला वेग

पुणे – आरोग्यभरती, महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा (टीईटी) घोटाळ्यामधील सहभागांची धरपकड सुरु असतानाच दुसरीकडं म्हाडा पेपर(Mhada exam scam) फुटीप्रकरणी पुणे सायबर पोलिसांनी (Pune cyber police ) आणखी एकाला ताब्यात घेतलं आहे. शरद भुसारी (Shard bhusari )असं अटक केलेल्या आरोपीचं नाव आहे. पुणे पोलिसांनी आतापर्यंत म्हाडा पेपर फुटीतीलप्रकरणातील मुख्य आरोपी असलेल्या डॉ. प्रीतिश देशमुख, संतोष हरकळ आणि अंकुश हरकळ यांच्या आणखी दोघांना यापूर्वीच पोलिसांनी अटक केली असून त्यांच्याकडे चौकशी सुरूच आहे. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेत काही आरोपी व पोलिसांना कोरोनाची लागण झाल्याने तपास थंडावला होता, मात्र आता पोलीस यंत्रणा सक्रिय झाली असून , वेगाने तपास करण्यास सुरुवात झाली आहे. म्हाडा ,आरोग्य भरती , टीईटी या सर्व घोटाळ्यांमधील आरोपीचे एकमेकांशी लागे बांधे असल्याने वेळोवेळी नवनवीन माहिती पोलिसांच्या समोर येत आहे. त्यामुळे घोटाळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत आहे.

पुणे पोलीस

टीईटी घोटाळ्यातील आरोपीचीही धरपकड

पुणे सायबर पोलिसांनी टीईटी घोट्याळ्यातील आणखी तीन दलालांना नुकतीच नुकतीच अटक केली आहे. संबंधित एजंटांनी उमेदवारांकडून कोट्यवधीची माया गोळा करून वाटून घेतल्याचे तपासात उघड झालं आहे. नाशिक, बुलढाणा, लातूर परिसरात छापे मारून दलालांना अटक करण्यात आली आहे. मुकुंदा जगन्नाथ सूर्यवंशी (वय 33, रा. नाशिक), कलीम गुलफेर खान (वय 52, रा. बुलढाणा), जमाल इब्राहिम पठाण (वय 40, रा. लातूर) अशी अटक केलेल्या दलालांची नावे आहेत. त्यामुळे टीईटीसह म्हाडा पेपर फुटीप्रकरणातील आणखी आर्थिक गैरव्यवहार उघडकीस येणार असल्याची महिती पोलिसांनी दिली आह पोलिसांनी सांगितले.

पोलीस भरतीतही घोटाळा

म्हाडा नोकर भरती घोटाळ्याप्रकरणी अटकेत असलेल्या प्रीतिश देशमुखच्या चौकशीत पोलिसांनी टीईटी परीक्षेतला गैरप्रकार उघडकीस आला. आता प्रीतिश देशमुखच्या चौकशीत आणखी एक धक्कादायक बाब समोर आली होती. ते म्हणजे प्रीतिश देशमुखच्या घरात पोलीस भरतीची ओळखपत्रं सापडली होती. यामुळे आरोग्य भरती, म्हाडा, टीईटीपाठोपाठ पोलीस भरतीची परीक्षा ही संशयाच्या भोवऱ्यात आली.

## आयफोनसाठी 5 लाख घेऊन अल्पवयीन मुलगा मुंबईत दाखल, नांदेडमध्ये व्यापाऱ्याच्या घरी काय घडलं?



नांदेडः मोबाइलच्या वेडामुळे हल्ली मुलांना चांगलं काय, वाईट काय याचं भान राहिलेलं नाही. महागडा मोबाइल मिळावा, या हट्टाला पेटलेल्या नांदेडमधल्या एका अल्पवयीन मुलाचेही असेच एक धक्कादायक कृत्य समोर आले आहे. वडिलांनी नवीन कपडे आणि आयफोन घेऊन दिला नाही, म्हणून मुलगा घरातून पळला. आपल्या मित्रासोबत हा मुलगा 17 फेब्रुवारी रोजीच घरातून निघाला आणि थेट मुंबईत दाखल झाला. धक्कादायक म्हणजे, मुलाने घरातून निघताना पाच लाख रुपयेदेखील सोबत घेतले होते. या प्रकरणी तक्रार दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आणि सुदैवाने आयफोन खरेदी करताना पोलिसांनी मुलांना ताब्यात घेतले. काय घडलं त्या दिवशी? या प्रकरणी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जुना कौठा भागातील व्यापाऱ्याच्या घरी लग्न असल्यामुळे ते आई व पत्नीसह बाहेरगावी गेले होते. त्यापूर्वी त्यांच्या 15 वर्षीय मुलाने नवे कपडे आणि आयफोन घेऊन देण्यासाठी भांडण केले. दुपारी 12 च्या सुमारास मुलाने घराला कुलूप लावून चावी शेजाऱ्याकडे ठेवून दिली. त्यावेळीच त्याने सोबत पैसे घेतले. तसेच शेजारी रहात असलेल्या मित्राला घेऊन दोघेही मुंबईच्या वाटेने निघाले. नांदेडहून पूर्णा येथे गेल्यानंतर तिथून ते पुण्याला गेले. कॅबने मुंबई गाठली. मालाड येथे या मुलाने 1 लाख 20 हजार रुपये किंमतीचा आयफोन खरेदी केला. तसेच इतर खरेदी करत असताना लोकेशनवरून मुंबई पोलीस त्याच्यापर्यंत पोहोचले. घटनास्थळावरून पोलिसांनी मुलांना ताब्यात घेतले.

पोलिसांनी कसा घेतला शोध?

ही मुले नांदेडहून बेपत्ता असल्याची माहिती मुंबई पोलिसांना सोशल मीडियातून मिळाली होती. यासबर सेलसह इतर विभागही कामाला लागले. तत्पुर्वी मुंबई पोलिसांनी नांदेड पोलिसांशी संपर्क साधून मुलांची माहिती मिळवली होती. त्यानुसार मालाड परिसरात मुलांनी आयफोन खरेदी केला. तेव्हाच मुलांचे लोकेशन कळले. मुले इतर ठिकाणी खरेदी करत असताना मुंबईचे सायबर पोलीस त्यांच्यापर्यंत पोहोचले. लगेच ही माहिती नांदेड ग्रामीण पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर नांदेड पोलिसांनी मुलांना ताब्यात घेऊन पालकांच्या स्वाधीन केले.

## कोल्हापूरच्या 'नादखुळा' पोरांमुळे बाईकचोरांचे 'टांगा पल्टी घोडे फरार', दोन सराईत चोर जाळ्यात

कोल्हापूर : कोल्हापुरात मोटरसायकल चोर गजाआड झाले आहेत. तरुणांच्या सतर्कतेमुळे बाईक चोरांच्या मुसक्या आवळण्यात यश आलं आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजमुळे बाईक चोरीचा उलगडा झाला. दुचाकी चोरांच्या सराईत टोळीकडून पोलिसांनी तब्बल दहा बाईक जप्त केल्या आहेत. अमित हत्तीकोटे आणि जमीर लाड अशी अटक केलेल्या दोघा आरोपींची नावं आहेत. तर त्यांच्या आणखी एका साथीदाराचा शोध पोलिसांकडून घेतला जात आहे. कोल्हापुरातील उत्तरेश्वर पेठ भागातील तरुणांच्या सतर्कतेमुळे बाईक चोरीची घटना उघडकीस आली आहे.

## घरफोडी करणारा सराईत गुन्हेगार मुद्देमालासह जेरबंद, चाळीसगाव रोड पोलिस प्रशासनाची कारवाई




धुळे : स्टील गोडाऊनचे पत्रा उचकून तारांचे बंडल व बांधकामाचे साहित्य चोरणारा सराईत गुन्हेगार नियाज अहमद अजीज खान या चोरट्याला चाळीसगाव रोड पोलिसांनी अटक केली आहे. नियाज अहमद अजीज खान उर्फ डिके (28) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीकडून 48 हजार रुपये किंमतीचा मुद्देमालही पोलिसांनी हस्तगत केला आहे. 17 फेब्रुवारी रोजी शहरातील के.डी.ओ. कॉम्प्लेक्स 80 फुटी रोडवरील व्यापारी दीपेश वसंत अग्रवाल यांचे स्टीलच्या गोडाऊनचे मध्यरात्री पत्रा उचकवून दुकानातील 40 तारांचे बंडल व बांधकामांचे साहित्य असा एकूण 74 हजार 500 रुपये किमतीचा मुदेमाल व रोख रक्कम चोरून नेल्याची तक्रार त्यांनी चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यात केली होती.

सीसीटीव्ही आणि खबऱ्याच्या मदतीने आरोपीला अटक

दुकानाजवळील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीच्या हालचाली व शरीरयष्टीवरून चाळीसगाव रोड पोलिस ठाण्यातील पथकाने गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळवत आरोपीला अटक केली. सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप पाटील व सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक नितीन चौधरी यांच्यासह शोध पथकातील कर्मचारी यांनी शहरातील मुल्ला कॉलनी भागातून या चोरट्याला अटक केली. पोलिस चौकशीत त्याने चोरी केल्याची कबुली दिली. त्या अनुषंगाने त्याच्याजवळ असलेले चोरीचे 40 तारांचे बंडल असा एकूण 48 हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सदर सराईत गुन्हेगार नियाज अहमद अजीज खान उर्फ डिके याच्यावर याआधीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप पाटील यांनी दिली आहे. तसेच या गुन्ह्याचा तपास हेड कॉन्स्टेबल मनोज पाटील करीत आहेत.

अहमदनगरमध्ये स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने 10 लाख लुटले अहमदनगरला कर्जत येथे स्वस्तात सोने देण्याच्या नावाखाली दहा लाखांना दरोडा घालणाऱ्या दरोडेखोरांपैकी एकास अटक करण्यात पोलिसांनी यश आलंय. सचिन पवार असं ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचं नाव आहे. आरोपीने आपल्या साथीदाराच्या मदतीने संतोष घुडे यांना स्वस्तात सोने देतो असे आमिष दाखवत कर्जत रोडवर कोळंभी येथे बोलावलं. घुडे सोने घेण्यासाठी गेले त्यावेळी 10 ते 12 जणांनी त्यांच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकत, लाकडी दांडक्याने त्यांना मारहाण केली. त्यानंतर त्यांच्या जवळचे 10 लाख रुपये लुटून पसार झाले. या घटनेची घुडे यांनी कर्जत पोलिसात तक्रार दिली होती. आरोपी सचिन पवार कुळधरण परिसरात येणार असल्याची माहिती कर्जत पोलिसांना मिळाल्यानंतर, सापळा रचून सचिन पवार याला ताब्यात घेतलं आहे. कर्जत पोलीस इतर आरोपींच्या शोधासाठी त्याची कसून चौकशी करत आहेत.

### अखेरपर्यंत मैत्री निभावली, सुप्रिया शिंदे

मित्र-मैत्रिणींचा मोलाचा वाटा ठरला. शिवशक्ती नगर भागातील ओम रेसिडेन्सी इमारतीमध्ये शिंदे कुटुंबाच्या घरात अनेक गोष्टी संशयास्पद असल्याचं त्यांना आढळलं होतं. अगदी सोफा-कम-बेडपासून पाण्याच्या ड्रमपर्यंत. पती किशोर शिंदे आणि मुलासह सुप्रिया शिंदे चार वर्षांपूर्वी ओम रेसिडेन्सीत राहायला आल्या होत्या. सातारा जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावातील असलेल्या अनेक रहिवाशांसोबत त्यांची मैत्री झाली. सुप्रियांच्या हत्येची उकल करण्यात या मैत्रीने महत्त्वाची भूमिका बजावली. मैत्रिणीने काय सांगितलं? "जेव्हा सुप्रियाने दार उघडले नाही किंवा फोन कॉलला उत्तर दिले नाही, तेव्हा मी माझ्याकडे असलेल्या चावीने संध्याकाळी 5.30 वाजता दरवाजा उघडला. घरी कोणीच नव्हते, पण मला काहीतरी चुकल्यासारखं वाटत होतं. बेडशीटला सुरकुत्या पडल्या होत्या आणि तिच्या केसांची क्लिप पडद्याला चिकटलेली होती. त्यांच्या घरातील पाण्याचा ड्रमही नेहमीच्या जागेपासून दूर होता" असं सुप्रिया शिंदे यांच्या एका मैत्रिणीने सांगितलं. मिड-डे वेबसाईटने यासंदर्भात वृत्त दिले आहे. मैत्रिणीने तिच्या इतर तिघी मैत्रिणींसह सुप्रिया शिंदे यांचा शोध सुरू केला. "ती आजारी असल्यानं डॉक्टरकडे गेली असेल, असा विचार करून आम्ही जवळपासच्या सर्व दवाखान्यात आणि हॉस्पिटलमध्ये गेलो. शेजारी राहणाऱ्या तिच्या नातेवाईकांशीही संपर्क साधला, पण कोणालाच काही माहिती नव्हती" असे दुसऱ्या मैत्रिणीने सांगितले. सुप्रियांच्या शेजाऱ्यांपैकी एकाने दुपारी त्याच्या घराबाहेर आरोपी विशाल घावटची चप्पल पाहिली होती. त्यावरुन त्यांनी विशालला विचारलेही होते, मात्र त्याने आपण केवळ 5 मिनिटं तिथे येऊन गेल्याचं सांगितलं. सोफा सेट, चप्पल आणि पाण्याचा ड्रम "आम्ही सुप्रिया शिंदे हरवल्याची तक्रार नोंदवत असताना, एका शेजाऱ्याने त्यांचे पती किशोर शिंदेंना फोन केला की त्यांच्या राहत्या घरातील सोफा-कम-बेडमध्ये त्यांचा मृतदेह सापडला आहे. त्यांच्या एका मैत्रिणीला तो सोफा हलल्याचं वाटत होतं, आणि तो व्यवस्थित बंद केला नसल्याचं वाटत होतं. म्हणून त्यांनी तो उघडून पाहिला" असं मानपाडा पोलिस स्टेशनच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. "मृतदेह सापडल्यानंतर दुसरा क्ल्यू शेजाऱ्याकडून मिळाला. विशाल घावटची चप्पल आणि त्याच्यासोबत झालेल्या संभाषणाची माहिती त्यांनी दिली" असंही पोलिसांनी सांगितलं. "आधी चौकशी करताना विशाल घावटने शिंदेंच्या घरात प्रवेश केल्याचे मान्य करण्यास नकार दिला. आपण तिला पुस्तके देण्यासाठी गेलो होतो आणि लगेच तिथून निघून गेलो, असं तो म्हणाला. त्याने सांगितलेले पुस्तक सुप्रिया यांच्या घरी सापडले. पण त्याची उत्तरं सतत बदलत होती, म्हणून आम्ही त्याला पोलिस ठाण्यात आणले." असंही पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं. हातावर चावल्याचा निशाण "दुपारी कुठे होता, याचं तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. तसेच, त्याच्या हातावर एक ताजी जखम होती, जी चावा घेतल्याची खूण दर्शवत होती. चाव्याचा निशाण कसा आला, हे सांगताना तो गोंधळून गेला" मानपाडा पोलिस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक शेखर बागडे यांनी सांगितले. "आम्ही त्याची आणखी कसून चौकशी करताच त्याने हत्या केल्याचे कबूल केले." "ती बेपत्ता आहे हे ऐकून आम्ही तिच्या फ्लॅटवर गेलो होतो आणि दोन तास त्या सोफ्यावर बसून राहिलो होतो. तिचा मृतदेह आत कोंबला असेल, अशी पुसटशी कल्पनाही मनाला शिवली नाही. गेल्या काही रात्री मी झोपू शकले नाही. मला खूप भीती वाटते." असं सुप्रियांची एक मैत्रीण म्हणाली. सुरुवात कुठून झाली? विशाल घावट त्याच परिसरात राहतो. सुप्रिया तिच्या मैत्रिणीला भेटण्यासाठी त्याच्या बिल्डिंगमध्ये जात असे. तिने त्याला पाहिले असले तरी ती त्याच्याशी कधीच बोलली नव्हती. मात्र तिचे पती किशोर यांनी त्याला एक-दोन वेळा चहासाठी घरी आणले होते. पोलिसांनी सांगितले की, विशालला सुप्रियाचा मनमिळावू स्वभाव हा जवळीकीची खूण वाटली. म्हणून त्याने तिच्याशी ओळख वाढण्याचा प्रयत्न सुरु केला. तिचा नवरा किशोर मुंबईत कामासाठी जातो आणि रात्री उशिरापर्यंत घरी परत येत नाही हे त्याला माहीत होते. पुस्तकं देण्याचा बहाणा शिंदे दाम्पत्याकडे छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा आहे आणि त्यांच्याबद्दल वाचायला आवडते, असे विशालला समजले होते. म्हणून तो काही पुस्तकं घेऊन सोमवारी सकाळी 11.30 वाजताच्या सुमारास तो त्यांच्या घरी गेला, परंतु त्यांचा मुलगा तिथे होता. "विशालला समजलं की त्यांचा मुलगा दुपारी 12.30 वाजता शाळेत जातो, म्हणून तो मंगळवारी, 15 फेब्रुवारी रोजी दुपारी 1.30 वाजता पुस्तकं घेऊन परत गेला. सुप्रियांनी विशालला आत बोलावलं, त्याला बसायला सांगितलं. ती पुस्तके ठेवण्यासाठी मागे फिरताच त्याने सुप्रियांवर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला" असे सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश वनवे यांनी सांगितले. "सुप्रिया शिंदेंनी सर्व शक्तीनिशी त्याचा प्रतिकार केला, मात्र तो तोकडा पडला.


## मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन,मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

महिला व बालकल्याण विभाग

जा.क्र.मनपा/ मबावि/२३८ /२०२१-२२ — दि . १८/२/२०२२

// जाहीर निविदा //

महिला व बालकल्याण समिती मार्फत **"बेटी बचाव"** योजने अंतर्गत विविध कामे उदा. **सुविचार,पॅम्पलेट छपाई, फोटो, पथनाटय, व्हिडिओ शुटिंग, चहा, पाणी व नास्ता** इ. कामे करणेकामी (अंदाजित खर्च रु.३,५०,०००/-) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ई-टेंडरिंग वेबसाइट **www.mbmc.gov.in** **Off-line** पध्दतीने इच्छुक अनुभवी ठेकेदाराकडून बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात येत आहेत. सदरकामी अधिक माहिती महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागात दि. १८/२/२०२२ रोजी पर्यंत उपलब्ध होईल. तसेच भरलेल्या निविदा दि. २८/२/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत महिला व बालकल्याण विभागात स्विकारण्यात येतील.सदरकामी निविदा फॉर्म फी रु.२००+ जी.एस.टी १८% असे एकूण रक्कम रु.२३६/- व इसारा रक्कम रु.२,०००/- रोखीने दि. २५/२/२०२२ रोजी दु. ३.०० वाजेपर्यंत भरुन त्याची पावती निविदा दरपत्रका सोबत जोडणे बंधनकारक राहिल.

सदरील निविदा शक्यतो त्याच दिवशी आवश्यक त्या कागदपत्राची पुर्तता केली असल्यास उघडण्यात येतील. सदरकामी निविदा मंजुर होताच आदेशानुसार त्वरीत काम करावे लागेल. तसेच कोणतेही कारण न देता एक निविदा स्विकारण्याचा अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार मा आयुक्त सो. यांनी राखून ठेवला आहे.

**सही/ -**
**(स्वप्निल सावंत)**
उप-आयुक्त(म.बा.वि)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**जा.क्र मनपा/जनसंपर्क/५३२/२०२१-२२**
**दिनांक १८/०२/२०२२**

पोलीस बातमी पत्र
महामुंबई
मुंबई, मंगळवार २२ ते २८ फेब्रुवारी २०२२




## संपादकीय...

# आरोग्य आणि धनसंपदा

देशासहित महाराष्ट्रालाही करोनाचा विळखा पडल्याने गेल्या वर्षी राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभागाची तरतूद काही हजार कोटींनी वाढवून ती १७ हजार कोटी केली. आता सहा आठवड्यांनी हे आर्थिक वर्ष संपेल. मात्र, 'जन आरोग्य अभियान' या संस्थेच्या पाहणीनुसार राज्य सरकारला या तरतुदीमधील केवळ ४७ टक्के म्हणजे आठ हजार कोटी रुपये खर्च करता आले. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात राज्य सरकारने पुरवणी मागण्या सादर केल्या; त्यात एक हजार १५२ कोटी रुपये 'आरोग्य सुविधा' वाढविण्यासाठी आणि करोना मृत्यूंच्या सानुग्रह अनुदानासाठी एक हजार कोटींची तरतूद करण्यात



आली. म्हणजे, मूळ तरतूद खर्च होण्याची शक्यता नसताना ही वाढीव तरतूद करण्यात आली. दुसरीकडे, करोना बळींच्या नातलगांना भरपाई देताना अंगचोरपणा करू नका, असे सर्वोच्च न्यायालय वारंवार खडसावत आहे. तरीही, खरा आकडा लपविण्याची धडपड चालू आहेच. तिजोरीत पैसा आहे, कागदोपत्री तरतूद आहे आणि अभूतपूर्व संकट थैमान घालत आहे; अशा स्थितीतही सरकारला सार्वजनिक आरोग्यावर ठरलेले पैसे खर्च करता येऊ नयेत, याहून दुसरी लाजिरवाणी गोष्ट नसेल. मग हा लोककेंद्री आणि संकटात हात देणारा कारभार कसा? करोनाच्या संभाव्य तिसऱ्या लाटेला तोंड देण्यासाठी सरकारने इतर खर्चात ४० टक्के कपात करून ५२ हजार कोटींची प्रचंड तरतूद करून ठेवली आहे. तिसऱ्या लाटेने राज्याला अपेक्षेपेक्षा कितीतरी कमी तडाखा दिला. असे असताना या वाढीव तरतुदीतील नेमके किती पैसे लागले, हा प्रश्न आहेच. करोनाला तोंड देण्यासाठी केवळ आरोग्य नव्हे तर इतर खात्यांमार्फतही मोठी तरतूद झाली; हे खरे आहे. मात्र, सार्वजनिक आरोग्य तसेच वैद्यकीय शिक्षण या दोन विभागांसाठी केलेली तरतूद खर्ची का पडली नाही, याचे प्रामाणिक उत्तर राज्य सरकारला द्यावेच लागेल. ती सरकारची नैतिक जबाबदारी आहे.या काळात सरकारने अनेक सुविधा निर्माण केल्या असल्या तरी करोनाशी लढताना राज्यातील नागरिकांच्या खिशातील हजारो कोटी रुपये खर्ची पडले आहेत. आजही पडत आहेत. हा खर्च करणारे सारे संपन्न, मध्यमवर्गीय नाहीत. मग या साऱ्यांपर्यंत आरोग्य खाते आणि सुविधा का पोहोचू शकल्या नाहीत? सरकारी खर्च योग्य रीतीने व टिकाऊ सुविधांच्या रूपाने वाढला असता तर या हजारो कुटुंबांना थोडा दिलासा मिळाला असता. आर्थिक वर्ष संपत आले की, सगळी सरकारी खाती बजेटमधली तरतूद खर्च करण्याच्या मागे लागतात. यंदाही तसे होईल. हा खर्च केला नाही तर पुढच्या वर्षी तरतूद कमी होईल, ही भीती असते. मात्र, असा कमी काळात बेफाट खर्च करण्याची पद्धत अशास्त्रीय आणि अनैसर्गिक आहे. खर्ची पडणाऱ्या रुपयाची पर्याप्त कार्यक्षमता हा मुद्दा तर विचारातच नसतो. या खर्चातल्या भ्रष्टाचाराचा मुद्दा चिंतेचा आहेच; तरीही 'पैसे खा, पण कामे करा' असे सामान्य माणूस उद्वेगाने मनोमन म्हणत नसेल तरच नवल.करोनाच्या आघाताने देशातील आरोग्य व्यवस्थेची लोकाभिमुख फेररचना करण्याचे आव्हान व संधी निर्माण केली आहे. प्रगत म्हणविणाऱ्या महाराष्ट्राने हे काम प्राधान्याने हाती घ्यायला हवे होते. करोना केंद्रांची कंत्राटे कुणाला मिळाली आणि रुग्णांना कोणत्या नेत्याच्या चेल्याने जेवणे पुरविली, याच्या पुढे जाऊन महाराष्ट्राची त्रिस्तरीय आरोग्य व्यवस्था आधुनिक व कोणतेही आव्हान पेलणारी कशी होईल, यावर कधी गंभीर चर्चा होणार आहे? आज एकीकडे सरकारी तरतूद खर्चही होत नसताना दुसरीकडे विविध आजार, शस्त्रक्रिया व महाग उपचार यांच्यामुळे हजारो कुटुंब कायमची गरिबीच्या खाईत लोटली जात आहेत. कर्जबाजारी होत आहेत. करोना काळात ही कोंडी कशी वाढली, हे सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार लक्षात आणून दिले आहे. महाराष्ट्र सरकारने करोनासाठी जसा कृतिगट नेमला; तसा राज्यातील वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य खात्यांची नवरचना करण्यासाठी तज्ज्ञगट नेमावा. गेल्या काही महिन्यांत सरकारने रिक्त पदांची भरती मोहीम हाती घेतली. ते ठीकच आहे. मात्र, नव्या इमारती, यंत्रसामग्री व औषधांची खरेदी आणि पदभरती मोहिमा या त्रिकोणातच सरकारी आरोग्य विचार अडकून पडला आहे. तो यातून बाहेर पडायचा असेल तर राज्यातल्या शेकडो स्वयंसेवी संस्थांची क्रियाशील मदत घेण्यापासून प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षम, उत्तरदायी करण्यापर्यंत अनेक पावले टाकावी लागतील. आरोग्य क्षेत्रात मोठे, पथदर्शी काम करणाऱ्यांशी महाराष्ट्राची नोकरशाही व बऱ्याचदा राज्यकर्तेही फटकून वागत आले आहेत. असे चालणार नाही.

# रुग्णालय खर्च परवडत नाही?

करोनाच्या महासाथीच्या काळात मांडल्या गेलेल्या या वर्षीच्या दुसऱ्या अर्थसंकल्पाकडून आरोग्य क्षेत्राला विशेष अपेक्षा होत्या. या महासाथीचा फटका सहन केल्यानंतर आता तरी सरकारने इतर अनेक देशांप्रमाणे आरोग्य सेवेवरचा आपला खर्च वाढवणे अपेक्षित होते. पण सरकारने या सगळ्याला वाटाण्याच्या अक्षता तर लावल्याच वर रस्त्यावरच्या शेवटच्या माणसाच्या हिताचा विचार करायचे बाजूला ठेवून 'डिजिटल' सेवांसाठी घसघशीत तरतूद करत आपणही फ्रान्सच्या राणीचे वंशज असल्याचा दाखला दिला.

सामान्य माणूस अर्थसंकल्प बघतो तेव्हा त्याला उत्कंठा असते की काय महागणार आणि काय स्वस्त होणार? आणखी दोन मुद्दे असतात – कर कमी भरावा लागणार का? घरकर्जाच्या व्याजावर सवलत मिळणार का? तो त्यामधील आरोग्यासाठीच्या तरतुदींकडे सहसा फिरकतही नाही. कारण मुळात त्याला याचाच अंदाज नसतो की आरोग्यासाठीच्या तरतुदी आपल्या जगण्याशी कशा भिडतात?

सरकार कल्याणकारी ही अंधश्रद्धा

आकस्मिक वैद्यकीय खर्चापोटी घरदार विकावे लागणाऱ्या भारतीयांची संख्या कोविड अगोदरही वर्षाला सहा कोटींच्या आसपास होती. आपण उद्योजक, राजकीय नेते, आयटी क्षेत्रात गलेलठ्ठ पगार घेणारे, सातवी वेतनवाढ मिळालेले सरकारी बाबू आणि वैद्यकीय विमा परवडणारे नसू तर आपण या सहा कोटींत असण्याची शक्यता खूपच मोठी आहे. ग्रामीण भागातल्या ७५ टक्के घरांत महिन्याला पाच हजार रुपयांपेक्षा आणि शहरातल्या ७३ टक्के घरांत महिन्याला २० हजारांपेक्षा कमी उत्पन्न असते! आणि या लक्षावधींचा वैद्यकीय उपचार मिळण्याबाबतच्या हतबलतेचा पट खूप मोठा आहे. करोनाकाळात काही अपवाद वगळता कॉर्पोरेट रुग्णालयांनी अक्षरश: हात धुऊन घेतले. टीबी, मलेरिया, लहान मुलांमध्ये होणारा न्यूमोनिया यामुळे वर्षाला काही लाख मृत्यू दर वर्षाला होतात. गर्भवती स्त्रियांमध्ये दर १०० गर्भवतींपैकी १५ सिझेरीयनची गरज असूनसुद्धा आदिवासी महिलांमध्ये अवघ्या १.५ टक्के महिलांना ती सोय मिळते. ही यादी संपणार नाही.

त्यामुळे जवळपास ७० टक्के भारतीय नागरिकांची गंभीर आजारी पडल्यावर किडय़ामुंग्यांसारखी गत होते, ही वस्तुस्थिती आहे. यापासून आपले संरक्षण करायला सरकार अर्थसंकल्पातील आरोग्यविषयक तरतुदींमध्ये काय व्यवस्था करते हे अभ्यासायला गेलो तर; निष्कर्ष एकच येतो, ''फुकट वेळ घालवू नका.'' केवळ हे फक्त या वेळच्या अर्थसंकल्पातच झाले आहे, असे नाही तर गेल्या २० वर्षांत हीच परिस्थिती आहे. महात्मा गांधींना अपेक्षित असलेल्या रस्त्यावरच्या शेवटच्या माणसाला केंद्रीभूत ठेवून सरकार कल्याणकारी योजना आखत असते अशी कुणाची समजूत असेल तर ती मोठी अंधश्रद्धा आहे. या वेळच्या अर्थसंकल्पातील आरोग्यविषयक तरतुदींमधूनसुद्धा नेमके हेच अधोरेखित होते आहे.

गरिबांसाठी नाहीच..

अर्थसंकल्प हे एक राजकीय विधान असते. साध्या मराठीत सांगायचे तर अर्थसंकल्पामधून सरकारची 'नियत' समजत असते. अर्थसंकल्पामधले हजार/ लाख/ कोटी वगैरे भंजाळून टाकणारे आकडे जरा बाजूला ठेवू. आपण हे बघू की परवडणारी, सहज उपलब्ध असलेली, उच्च दर्जाची आणि आपल्यापर्यंत पोहोचणारी वैद्यकीय व्यवस्था निर्माण करण्यासाठी सरकार या अर्थसंकल्पानुसार काही खर्च करणार आहे का? अचानक ॲपेंडिक्सचे दुखणे उद्भवले, फ्रॅक्चर झाले, सिझेरीयन उद्भवले, हृदयविकाराचा झटका आला तर लक्षावधी लोकांना खासगी रुग्णालयांमध्ये पाऊलही ठेवता येत नाही. त्यांना एकच आसरा असतो. जवळचे प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुक्याचे सरकारी रुग्णालय आणि जिल्ह्याचे सरकारी रुग्णालय. इथे त्यांना समाधानकारक आरोग्य सेवा मिळायची तर डॉक्टर लागणार, नर्स लागणार, वॉर्डबॉय-आयाबाई लागणार – औषधेसुद्धा मोफत लागणार. कारण साधी खोकल्याची बाटली सरकारी दवाखान्यात उपलब्ध नसल्यामुळे त्यांना लिहून दिली गेली तर ती आणायला शंभरची नोट लागते. 'सैन्य पोटावर चालते' हे नेपोलियनने वाक्य सगळ्यांनीच शाळेत ऐकले- वाचलेले असते. पण सरकार कोणत्या शाळेत शिकले कुणास ठाऊक? ते नेमके सरकारी आरोग्य व्यवस्थेच्या पोटावरच पाय देते आणि तिला म्हणते, लढा!

गेल्या वर्षी सरकारी आरोग्य यंत्रणांवर जो खर्च केला होता त्यात या वर्षी वाढ झाली आहे फक्त ५८६ कोटींची, पण महागाई लक्षात घेतली तर असे दिसते की सात टक्क्यांनी रक्कम कमीच झाली आहे. आरोग्यावर खर्च होताना दिसते अवाढव्य रक्कम ८९२५१ कोटी. पण ती एकूण सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या फक्त दीड टक्का आहे. बाकीचे देश सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या किती टक्के खर्च आरोग्यावर करतात? बांगलादेश २.३४ टक्के, श्रीलंका ३.७३ टक्के, थायलंड ३.८ टक्के. अमेरिका १८ टक्के. युरोप, जपान ७ ते ८ टक्क्यांच्या आसपास. आरोग्यावर गेली २० वर्षे दीड टक्का इतका कमी खर्च आपले सरकार करत आहे त्यामुळे आकस्मिक आजार कोसळतात, तेव्हा जगायचे तर आपल्याला खिशात हात घालायला लागतोच. यात अमेरिका आणि भारतात एक मोठे अभिमानास्पद साम्य आहे. आरोग्यावर एकूण खर्च जेवढा होतो त्यातला या दोन्ही देशांत सरकार अंदाजे ५० टक्के खर्च करते आणि लोकांना ५० टक्के करावा लागतो. ब्रिटन आणि कॅनडामध्ये सरकार एकूण ८५ टक्के आणि ८८ टक्के वाटा उचलते आणि लोकांना फक्त १५ टक्के आणि १२ टक्के खर्च करावा लागतो.

खासगी सेवेला उत्तेजन

सत्तेत कोणत्याही पक्षाचे सरकार असो, अर्थसंकल्पातील आरोग्यविषयक तरतुदींची वर्षांनुवर्षे एकच दिशा आहे,''सरकारी आरोग्यसेवेला कुपोषित ठेवा आणि अनियंत्रित खासगी वैद्यकीय सेवेला उत्तेजन द्या. आरोग्यसेवेला बाजारपेठेमध्ये उभे करा. हे वर्षसुद्धा याला अपवाद



नाही. लक्षावधी गरिबांना आधार देणाऱ्या नॅशनल हेल्थ मिशन म्हणजे सरकारी वैद्यकीय यंत्रणेवर खर्च होणार आहेत ३७ हजार कोटी. गेल्या वर्षीपेक्षा ४१०६ कोटी कमी! या ३७ हजार कोटींतील ७५०० कोटी खर्च होणार सरकारी वैद्यकीय महाविद्यालये उभारायला आणि ती उभारली जाणार आहेत पीपीपी मॉडेलने. पीपीपीचा अर्थ आहे – प्रायव्हेट प्रॉफिट थ्रू पब्लिक मनी. गरिबाने बीडीकाडीवर भरलेल्या करातून खासगी क्षेत्राचा नफा. त्यातही ही खासगी रुग्णालये कशी? तर जवळपास अनियंत्रित! कुणालाही उत्तरदायी नाहीत. त्यातली कॉर्पोरेट तर उत्तरदायी असतात ती फक्त भागधारकांना आणि त्याला दिल्या जाणाऱ्या वार्षिक परताव्याला. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातं अशी ही गत! इकडे सरकारी वैद्यकीय यंत्रणेला उपलब्ध झालेल्या तुटपुंज्या रकमेमुळे रडगाणे सुरूच! डॉक्टरांची पदे भरलेली नाहीत, नर्सेस कमी, औषधे नाहीत. आहे त्यातही भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता. गरिबाच्या नशिबाला आलेले भोग तसेच चालू. एवढय़ावर हे हाल संपलेले नाहीत.

अर्थसंकल्पातील आरोग्याच्या क्षेत्रावरील तरतूद हा एकूणच सरकारी धोरणांचा एक छोटा भाग असतो. केंद्रात निती आयोगाने आणि महाराष्ट्रात राज्य सरकारने असे धोरण स्वीकारले आहे की मोठी शासकीय रुग्णालये यापुढे खासगी वैद्यकीय महाविद्यालये काढायला खासगी कंपन्यांना द्यायची. म्हणजे गरीब रुग्ण 'आधीच उघडा त्यात थंडीने कुडकुडून मेला' अशी परिस्थिती. सरकारी वैद्यकीय यंत्रणा कुपोषित ठेवून खासगी वैद्यकीय क्षेत्राला प्रोत्साहन द्यायचा अजून एक राजमार्ग बहुचर्चित 'प्रधान मंत्री जन आरोग्य योजने'चा (PMJAY) आहे. यात खासगी रुग्णालयांना सरकार जवळपास ७५ टक्के पैसा देते. या सरकारच्या लाडक्या योजनेने काय केले करोनाकाळात? करोनाकाळात जगण्यासाठी भारतभर नागरिक आपल्या खिशातून जवळपास ७० हजार कोटी खर्च करत असता 'प्रधान मंत्री जन आरोग्य योजने'साठी (PMJAY) तरतूद झालेल्या ६४१२ कोटींपैकी खर्च केले गेले फक्त ३१९९ कोटी!

भरवशाच्या म्हशीला टोणगा!

सरकारला बहुधा ज्योतिषाने सांगितले आहे की करोना गेला! त्यामुळे गेल्या वर्षी करोनासाठी रक्कम ठेवली होती १६,५४५ कोटी. आता ती केली आहे २२६ कोटी. म्हणजे 'करोना' विषाणूला 'आमच्यावर दया कर' असं साकडं घालणं एवढंच आता आपल्या हातात! करोनाचा एवढा हाहाकार झाला. त्यात बाजीप्रभूसारखी लढली ही आधीच पंगू असलेली सरकारी यंत्रणा. पण या आरोग्य कर्मचाऱ्यांना विमा संरक्षण देण्याची तरतूद मात्र ८१३ कोटींवरून २२६ कोटी इतकी कमी करण्यात आली आहे. म्हणजे तुमचं तुम्ही बघा.

कोण म्हणतं सरकार करोनातून काही शिकलं नाही? सरकार व्यवस्थित शिकलं की मोठय़ा कॉर्पोरेट रुग्णालयांपेक्षा सरकारी 'एम्स रुग्णालयं' जास्त चांगली आहेत. आणि अगदी खरं आहे ते. या सरकारी एम्समध्ये एका फोनवर राज्यकर्त्यांना, कार्यकर्त्यांना, नोकरशहांना दाखल होता येते. भारतभरचे नागरिक लाखो रुपये देऊन रुग्णालयात एका खाटेची भीक मागत फिरतात तेव्हा या लाडक्या वर्गाला मात्र एम्स उत्तम आणि विनामूल्य सेवा देतात. त्यामुळे सरकार अजून १०,००० कोटी (एकूण २०,००० कोटी) खर्च करणार आहे एम्ससाठी.

# फ्लॅट बुक करूनही ताबा नाही

आकर्षक सोयीसुविधा, फ्लॅट बुकिंगनंतर दीड वर्षात फ्लॅटचा ताबा दिला जाईल, अशी जाहिरातबाजी करून ग्राहकांना फ्लॅट बुक करण्यास भाग पाडून नंतर फ्लॅटचा ताबा न देता सात ग्राहकांची दोन कोटी २७ लाखांची फसवणूक करणाऱ्या एका नामांकित कंपनीच्या दोन संचालकांसह चौघांविरुद्ध ठाण्यातील नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. गंभीर बाब म्हणजे इतरही १८० जणांची फसवणूक झाली असून ठाणे आर्थिक गुन्हे शाखेकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

अंबरनाथमधील चिखलोली परिसरात उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाविषयी संबंधित कंपनीने जाहिरात केली होती. जाहिरातीमध्ये विविध प्रकारच्या सोयीसुविधा देण्यात येतील, असा उल्लेख असल्याने ही जाहिरात पाहून नवी मुंबईतील एक ट्रान्सपोर्ट व्यावसायिक कंपनीच्या ठाण्यातील नौपाडा भागात असलेल्या कार्यालयात आला. कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी प्रकल्पाविषयी व्यावसायिकाला माहिती देत केवळ एक रुपयामध्ये फ्लॅट बुकिंग करू शकता, असे सांगितले. बँक किंवा वित्तीय संस्थेमार्फत गृहकर्ज मिळवून देऊ, असेही व्यावसायिकाला सांगण्यात आले. फ्लॅटचा ताबा बुकिंग केल्याच्या तारखेपासून १८ महिन्यांच्या आत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. तसेच फ्लॅटचा ताबा मिळेपर्यंत कर्जाचे हफ्ते आणि प्रीईएमआय देखील भरण्यात येईल, असेही प्रलोभन कंपनीतर्फे दाखवण्यात आल्याने व्यावसायिकाने सन




२०१३ च्या मार्च महिन्यात फ्लॅट बुक केला. नंतर व्यावसायिकाने फ्लॅट खरेदीपोटी २२ लाख ७३ हजार रुपये दिले. उर्वरित रक्कम टप्प्याटप्प्याने देण्याचे ठरले होते. या फ्लॅटची दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात आली असून फ्लॅट खरेदी करण्यासाठी व्यावसायिकाने बँकेतून लाखो रुपये कर्ज काढले आहे.परंतु, संबंधित कंपनीने फ्लॅटचा ताबा वेळेत दिला नाही. तसेच कर्जावरील पाच लाखांचे व्याजही व्यावसायिकालाच भरावे लागले असून गृह प्रकल्पाचे काम संथ गतीने चालू असल्याने २०१४ च्या डिसेंबर महिन्यात ताबा देण्याऐवजी २०१५च्या जूनमध्ये देण्याचे आश्वासन कंपनीने दिले होते. त्याचदरम्यान हा व्यावसायिक तसेच इतरही ग्राहक बांधकाम साईटवर गेले असता, इमारतीचे कामच बंद असल्याचे आढळले.

ग्राहकांनी ठाण्यातील कार्यालयात प्रकल्पाविषयी चौकशी केल्यानंतर काही तांत्रिक अडचणीमुळे प्रकल्प बंद असल्याचे त्यांना उत्तर मिळाले. शिवाय प्रकल्पाचे काम लवकरच चालू होईल, असेही आश्वासन ग्राहकांना देण्यात आले होते. मात्र, काम चालू झाले नाही आणि ग्राहकांना फ्लॅटचा ताबाही मिळाला नाही.या प्रकरणी व्यावसायिकाच्या तक्रारीनंतर एकूण सात ग्राहकांची २ कोटी २७ लाख २५ हजार ७३६ रुपयांची फसवणूक केल्याद्दल या कंपनीच्या संचालकांसह दस्तनोंदणी करणारे दोघे अशा एकूण चार जणांविरुद्ध नुकताच नौपाडा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आली आहे.

# बेकायदा बियाण्यांची विक्री

बेकायदा सूर्यफुल बियाण्याची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कृषी सेवा केंद्र चालकांसह बियाणांचा पुरवठा करणाऱ्या कंपनीच्या विरोधात सिल्लोड शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी बियाणे निरीक्षक तथा औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मोहीम अधिकारी दीपक गवळी यांनी फिर्याद दिली आहे.




चढ्यादराने सूर्यफुल बियाणांची अनाधिकृतपणे विक्री होत असल्याची माहिती जिल्हा कृषी विभागाच्या पथकाला मिळाली होती. यावरून दीपक गवळी, विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयाचे गुणनियंत्रक तंत्र अधिकारी पी. एस. पवार यांनी बुधवारी सायंकाळी शहरातील स्वामी समर्थ ॲग्रो एजन्सीला भेट देऊन तपासणी केली.

यात बियाणे तथा कीटकनाशक परवाना विक्रीसाठी दिलेल्या पत्त्यामध्ये तफावत आढळून आली; तसेच विनापरवाना सूर्यफुल बियाणांची चढ्या दराने विक्री होत असल्याचे निदर्शनास आले. ॲग्रीम होलसेल प्रायव्हेट लिमिटेड, गुरूग्राम (हरियाणा) या कंपनीच्या सूर्यफुल बियाणांची विक्री होत होती. या कंपनीकडे सदर वानाचा परवाना नसल्याचे समोर आले; तसेच तपासणी करताना मान्सून सिड्स प्रायव्हेड लिमिटेड, उरुळी देवाची या कंपनीचा महाराष्ट्र राज्याकरिता बियाणे विक्री परवाना आहे का, याबाबत पुणे येथील अधिकारी तथा संचालक कृषी आयुक्तालयांकडे विचारणा करण्यात आली. यात सदर कंपनीकडे महाराष्ट्र राज्याकरिता बियाणे विक्री करण्याचा परवाना नसल्याचे समोर आले. या प्रकरणी दीपक गवळी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मान्सून सिड्स प्रायव्हेट लिमिटेडचे वितरक ॲग्रीम होलसेल प्रायव्हेड लिमिटेड, गुरुग्राम (हरियाणा), स्वामी समर्थ ॲग्रो एजन्सीचे मालक गणेश सोनाजी गोराडे व उत्तम निंबाजी देवरे यांच्या विरोधात शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा कृषी विभागाच्या पथकाने यापूर्वीही तालुक्यातील आमठाणा येथे छापा मारून बोगस कीटकनाशक विक्रीचा प्रकार समोर आणला होता.

# डॉक्टर गजाआड,दोघांचा शोध

## छावणीतील प्रेस्टीज हॉस्पिटलमधील घरफोडी प्रकरणात सदर पोलिसांनी डॉक्टरला अटक केली आहे.

नागपूर : छावणीतील प्रेस्टीज हॉस्पिटलमधील घरफोडी प्रकरणात सदर पोलिसांनी डॉक्टरला अटक केली आहे. याप्रकरणात त्याचे दोन साथीदार फरार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.डॉ. भूपेंद्र सेवक लवात्रे (वय ४३, रा. कल्पनानगर, नारी रोड),असे अटकेतील डॉक्टरचे नाव आहे. डॉ. राजेश तुळसीराम बघे (वय ५० रा. प्रियदर्शनी कॉलनी,अमरावती मार्ग ) व प्रशांत नत्थू भोंडे (वय ४१ रा. बोरकुटे ले-आऊट, विवेकानंदनगर) हे दोघे फरार आहेत. डॉ. अनिल जैन यांच्या तक्रारीवरुन तिघांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, डॉ. जैन यांनी हॉस्पिटलमधील दोन माळे भाड्याने दिले. तर तिसरा माळा त्यांच्या ताब्यात होता. दरम्यान, ते कॅनडा येथे गेले. तिसऱ्या माळ्यावर डॉ. बघे , लवात्रे व त्यांच्या साथीदारांनी ताबा घेतला. जैन कॅनडाहून परतले. त्यांनी माळ्यावर ताबा घेतलेला दिसला. आलमारीतील दागिने व ६० हजार रुपये गायब होते. जैन यांनी सदर पोलिसांत तक्रार दिली. पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला. पोलिसांनी डॉ. लवात्रे यांनी १० नंबर पुलाजवळील व्हिनस हॉस्पिटलमधून अटक केली. त्यांची पोलिस कोठडी घेतली.



# पुण्यातील 'मटका किंग'चा निर्घृण खून

पुणे: बिबवेवाडी परिसरात राहणाऱ्या एका तरुणाची सातारा जिल्ह्यातील शिरवळ येथे गोळ्या झाडून हत्या करण्यात आली आहे. ही घटना काल रविवारी सायंकाळी ही घडली. संजय पाटोळे (३६, बिबवेवाडी) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. संजय पाटोळे हा 'मटका किंग' म्हणून ओळखला जायचा.

या प्रकरणी मिळालेल्या माहिती नुसार, शिरवळ येथील निरा नदी काठावरील एका अपार्टमेंटच्या टेरेसवर त्याच्यावर गोळ्या झाडण्यात आल्या आहेत. 'लेक पॅलेस' असं या अपार्टमेंटचे नाव असून या सोसायटीच्या तिसऱ्या विंगच्या टेरेसवर हा तरुण रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. त्यानंतर त्याला तातडीने रुग्णालयात देण्यात आले. परंतु उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

घटनेची माहिती मिळाल्यानंतर शिरवळ पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांना या तरुणाच्या खिशात पाकीट सापडले. त्यात त्याचे आधार कार्ड होते. त्यावरून हा तरुण पुण्यातील बिबवेवाडी येथील राहणार असून त्याचे पूर्ण नाव संजय सुभाष पाटोळे असल्याचे समजले.

# एकाचवेळी तीन मुलांचा शेत तळ्यात बुडून मृत्यू!



औरंगाबाद: खेळण्यासाठी घराबाहेर पडलेल्या तीन मुलांचा शेत तलावात बुडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना औरंगाबादच्या दौलताबाद भागातील शरणापूर परिसरातील घडली आहे. प्रतीक भिसे (वय १५), तिरुपती उदळकर (१७), शिवराज पवार (१६) अशी मुलांची नावं आहेत. तीनही मुलं रविवारपासून बेपत्ता होती तर याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिसांत याप्रकरणी बेपत्ता असल्याची सुद्धा नोंद करण्यात आली होती.मिळालेल्या माहितीनुसार, शेत तळ्यात बुडालेली तीनही मुलं वाळूज येथील सारा संगम सोसायटीच्या बजाज नगर येथील रहिवासी आहेत. रविवारी सायकल घेऊन तीनही मुलं दुपारी एक वाजेपासून घराबाहेर पडली होती. मात्र रात्रीपर्यंत घरी तीनही मुलं परत न आल्याने त्यांची शोधाशोध सुरु होती. दरम्यान, आज तीनही मुलांचा मृतदेह शरणापूर येथील शेत तळ्यात सापडला आहे.

शरणापूर येथे शेततळ्यात तीन मुलांचा मृतदेह पाण्यात तरंगत असल्याचं कळताच घटनास्थळी मोठी गर्दी पाहायला मिळाली.

# स्वस्तात सोने देण्याच्या नावाखाली दहा लाख लुटले

## सोने देण्याच्या नावाखाली गंडा घालणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

अहमदनगर: स्वस्तात सोने देण्याच्या आमिषाने बाहेरच्या जिल्ह्यातील व्यापाऱ्यांना गोड बोलून नगर जिल्ह्यात बोलावायचे. निर्जन ठिकाणी नेऊन त्यांच्यावर हल्ला करायचा आणि पैसे घेऊन पळून जायचे, असे गुन्हे नगर जिल्ह्यात सरार्स घडतात. तरीही अनेक जण याला बळी पडतात. कर्जत (जि. रायगड) येथील एका बांधकाम व्यावसायिकालाही अशाच पद्धतीने सुमारे दहा लाखांना लुटण्यात आले. अशा गुन्ह्यातील आरोपी शक्यतो सापडत नाहीत, मात्र नगर जिल्ह्यातील कर्जत पोलिसांनी यातील एका आरोपीला शिताफीने अटक केली. त्याच्याकडून टोळीचे कारनामे उघड होत आहेत.

कर्जत तालुक्यातील कोंभळी फाटा येथे ९ फेब्रुवारी २०२२ रोजी अशीच एक घटना घडली होती. आरोपींच्या टोळीने त्यांच्या पद्धतीनुसार बांधकाम व्यावसायिक संतोष रामचंद्र घुडे, (वय ४३, रा. आंबिवली ता. कर्जत, जि. रायगड व त्यांचा मित्र यांना स्वस्तात सोने देण्याचे आमिष दाखविले. टोळीतील एक साथिदार विठ्ठल जाधव (खरे नाव माहीत नाही) यांनी त्यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी सोने घेण्याची तयारी दर्शविताच त्यांना नगर-सोलापूर रोडवर कोंभळी फाट्याजवळील शेतात पैसे घेऊन बोलाविले.



त्यांच्यावर विश्वास ठेवून घुडे व त्यांचा मित्र तेथे आले. तेव्हा तेथे दबा धरून बसलेल्या दहा ते बारा जाणांच्या टोळीने त्यांच्यावर हल्ला केला. घुडे यांना लाकडी दांड्याने मारहाण केली. त्यांच्या डोळ्यात मिरचीची पूड टाकून त्यांच्याकडील दहा लाख रुपये व तीन मोबाईल हँडसेट असा दहा लाख, १८ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन आरोपी पळून गेले. घुडे यांनी कर्जत पोलिस ठाण्यात जाऊन फिर्याद दिली. त्यानुसार दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास करताना कर्जतचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी आरोपींची माहिती मिळविण्यास सुरवात केली. तेव्हा त्यांना सचिन आल्या पवार (रा. राक्षसवाडी ता. कर्जत) याच्याबद्दल माहिती मिळाली. तो कुळधरण परिसरात असल्याचे समजल्यावर पोलिसांचे पथक तेथे गेले. तेथे आरोपीला अटक केली. त्याच्याकडे विचारपूस केल्यावर त्याने गुन्ह्याची आणि साथिदारांचीही माहिती दिली. त्याला पाच दिवसांची पोलिस कोठडी मिळाली असून साथिदारांचा शोध सुरू करण्यात आला आहे. पोलिस उपअधीक्षक अण्णासाहेब जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक अमरजित मोरे, अमंलदार अंकुश ढवळे, सुनील चव्हाण, पांडुरंग भांडवलकर, शाम जाधव, सुनील खैरे, महादेव कोहक, गोवर्धन कदम यांच्या पथकाने ही कामगिरी केली. आरोपी फसवणूक कशी करतात, याबद्दल पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी सांगितले की, या भागात अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या टोळ्या आहेत. बाहेरच्या जिल्ह्यातील व्यावसायिकांना शोधून, त्यांचा विश्वास संपादन करून त्यांना अशा पध्दतीने लुबाडले जाते.

# कुरकुरेचे आमिष दाखवून दोन अल्पवयीन मुलांनी चिमुरडीसोबत केले संतापजनक कृत्य!



औरंगाबाद: शहरातील वाळूज भागातील बजाजनगर परिसरातील एका चार वर्षीय चिमुरडीवर दहा ते बारा वर्षीय दोन अल्पवयीन बालकांनी अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. ही घटना दोन दिवसांपूर्वी घडली असून काही सामाजिक कार्यकर्त्यांच्या पुढाकाराने प्रकरणाला वाचा फुटली आहे. तर याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.अधिक माहिती अशी की, बजाजनगर परिसरातील एका वसाहतीतील चार वर्षीय चिमुरडीवर दोन अल्पवयीन बालकांनी १८ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास घराच्या गच्चीवर नेऊन अत्याचार केल्याचा प्रकार रविवारी समोर आला. कुरकुरे देण्याचे आमिष दाखवून या दोन अल्पवयीन बालकांनी चिमुरडीवर आत्याचार केला असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.गुप्तांग दुखत असल्याची तक्रार चिमुरडीने दोन दिवसांपूर्वी रात्री आई वडीलांना सांगितली. त्यामुळे चिमुरडीच्या आईने बघीतले त्यावेळस गुप्तांगांवर सुज आल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे चिमुरडीच्या आईने तिची विचारपूस केली. त्यावेळी चिमुरडीने घडलेला प्रकार आई वडीलांना सांगितला. त्यावरून चिमुरडीच्या आईने परिसरातील महिला सामाजिक कार्यकर्त्यांना ही बाब सांगितले. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलिस ठाण्यात धाव घेतली. त्यानंतर याप्रकरणी चिमुरडीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# महिला चोरांच्या टोळीला रंगेहाथ अटक



लग्नसमारंभांत वऱ्हाडी बनून दागिने चोरी करणाऱ्या महिला चोरांच्या टोळीला जुनी कामठी पोलिसांनी रंगेहाथ अटक केली.

कन्हानमधील सत्रापूर येथील रंगारी यांच्या कुटुंबातील तरुणीचे रविवारी जुनी कामठीतील संजीवनी सभागृह येथे रविवारी लग्न होते. या लग्नात चौघीही वऱ्हाडी बनून आल्या. रेषा रवी कापसे (वय ५०) यांनी जेवण केले. त्या पाणी घेण्यासाठी नळाजवळ गेल्या. येथे आधी मालती, सुवर्णा, मिताली व अरुणा उभ्या होत्या. मितालीने रेषा यांच्या गळ्यातील मंगळसूत्र ओढले. रेषा यांनी वेळीच ते मंगळसूत्र पकडले. अर्धे मंगळसूत्र त्यांच्या हाती लागले. रेषा यांनी मागे बघितले. जवळ उभ्या महिलांवर त्यांना संशय आला. रेषा यांनी आरडाओरड केली. चौघीही पळायला लागल्या. इतर वऱ्हाडी व सुरक्षारक्षकांनी सभागृहाबाहेर चौघींना पकडले. जुनी कामठी पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळताच पोलिस तेथे पोहोचले.

# रोज स्वीकारली गेली 66 हजारांची लाच



नागपूर : शासकीय विभागात सर्व दस्तऐवज दिल्यानंतरही लाचेशिवाय कामच होत नाही, हा आजवरचा अनुभव. गेल्या दीड महिन्यात तर लाचेने कहरच केला. या कालावधीत राज्यात तब्बल ३१ लाखांची 'उलाढाल' झाली.लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केलेल्या कारवाईनुसार, राज्यात रोज ६६ हजारांची लाच स्वीकारल्या गेल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दीड महिन्यात ७८ सापळे रचून १०६ लाचखोरांना गजाआड केले. १०६ जणांनी एकूण ३१ लाख ८३ हजार ३५० रुपयांची लाच घेतली.एसीबीच्या नाशिक विभागांतर्गत सर्वाधिक १८ कारवायांमध्ये २८ लाचखोरांना एसीबी कोठडीची हवा खावी लागली. त्याखालोखाल पुणे विभागात १४ कारवायांमध्ये १९ जणांना अटक करण्यात आली. ठाणे विभागात १० प्रकरणांत १३ जण गजाआड झाले. औरंगाबादमध्ये १२ तर नांदेडमध्ये ११ कारवाया करण्यात आला. औरंगाबादमध्ये १५ तर नांदेडमध्ये ११ लाचखोर सापडले. मुंबई व नागपूर विभागांतर्गत १७ फेब्रुवारीपर्यंत पाच सापळ्यांमध्ये प्रत्येकी आठ जण कोठडीत पोहोचले. अमरावती विभागांतर्गत चार सापळ्यांमध्ये पाच जण अडकले. पोलिस पहिल्या क्रमांकावर जानेवारी ते १७ फेब्रुवारी या कालावधीत पोलिस विभागांतर्गत सर्वाधिक लाच घेण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १६ सापळ्यांमध्ये वर्ग एक व दोन दर्जाच्या प्रत्येकी दोन अधिकाऱ्यांसह २४ जणांना अटक केली. त्यांनी १० लाख ७२ हजार ५०० रुपयांची लाच घेतली.

# तहसीलदारांनी घरात घुसून महिलांना धमकावल्याचा आरोप



एकीकडे वाळूमाफियांच्या अरेरावीमुळे गेवराई तालुका चिंताग्रस्त आहे तर चक्क दुसरीकडे चक्क तहसीलदारांवरच गुन्हा दाखल झाल्याने बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. गेवराईचे तहसीलदार सचिन खाडे यांनी महिलांना घरात घुसून धमकी दिल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. घरातील कोणाचीही परवानगी न घेता घरात घुसून महिलांना धमकवल्या प्रकरणी गेवराईचे तहसीलदार सचिन खाडे यांच्यासह सात ते आठ अनोळखी व्यक्तींवर गेवराई पोलीस ठाण्यात वेगवेगळया तीन महिलांच्या फिर्यादीवरुन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

दरम्यान, तिन्ही फिर्यादी महिला गेवराईच्या समृद्धी नगर भागातील रहिवासी असून त्यांच्या घरी विनापरवाना जाऊन तुम्ही वाळु प्रकरणातील आरोपी लपवुन ठेवले आहेत, असं म्हणत धमकवल्याचं या महिलांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. मात्र अगोदरच गेवराईमधील अवैध वाळु उपशाचा प्रश्न ऐरणीवर आलेला असतानाच आता वाळुचा वाद घरापर्यंत गेला असल्याचे दिसून येतंय. फिर्यादीत सांगितल्याप्रमाणे तहसीलदार सचिन खाडेंसोबत आणखी सहा ते सात लोक कोण होते? ते पोलीस तपासात स्पष्ट होईल.कणीही असो, दोषींवर कारवाई होणारच, महिला आयोग आक्रमक तर या सर्व प्रकरणी आम्ही जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर करणार असल्याचे सांगत महिलांवर अन्याय होत असेल तर त्याच्यावर कारवाई होणारच, मग तो कोणीही असो अशी प्रतिक्रिया राज्य महिला आयोगाच्या सदस्या संगिता चव्हाण यांनी दिली आहे.

महिला आयोगाच्या अध्यक्षांचेही चौकशीचे आदेश

ब◌ीड जिल्ह्यातील गेवराईचे तहसिलदार सचिन खाडे यांनी घरात घुसून महिलांना धमकावल्याची माहिती समाजमाध्यमाद्वारे समजली.

# लातूर अंबाजोगाई रस्त्यावर भीषण अपघात



लातूर : अंबाजोगाई-लातूर रस्त्यावर सायगाव जवळ शनिवारी दि. १९ फेब्रुवारी रोजी पहाटे दीडच्या सुमारास भीषण अपघात झाला. रस्त्याच्या बाजूला उभ्या असलेल्या पिकअपला भरधाव वेगात असलेल्या टेम्पोने पाठीमागून धडक दिली. या अपघातात पिकअपच्या मागे थांबलेल्या चालकाचा जागीच मृत्यू, तर पिकअपमधील १९ जण जखमी झाले. या अपघातातील मृत आणि जखमी हे लातूर जिल्ह्यातील आजनी बु. (ता. शिरूर अनंतपाळ) येथील आहेत. आजनी येथील ठाकूर कुटुंबीय इतर नातेवाईकांसह वास्तूशांतीच्या कार्यक्रमासाठी पिकअप (एमएच २४ एबी ६६२४) या वाहनातून अहमदनगरला जात होते. रस्त्यात ते नंदगोपाल डेअरीजवळ पिकअप रस्त्याच्या बाजूला लावून उतरले होते.सध्या १२ जखमींवर स्वाराती रुग्णालयात उपचार सुरु असून, एकास लातूरला हलविण्यात आले आहे. अपघाताची माहिती मिळताच बर्दापूर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन जखमींना मदत केली.

# अरेच्चा! विवाहित पुरुषांच्या बायकोविरोधात १२७ तक्रारी

हिंगोली : विवाह बंधनानंतर नवरा बायकोचे नाते हे सगळ्यात मजबूत असते असे मानले जाते. पण सध्याच्या तरुणाईमध्ये हे वास्तविक कमी आणि काल्पनिक जास्त वाटू लागलं आहे. कारण, नेहमी असं ऐकायला मिळतं की माझा नवरा किंवा माझी बायको मला समजूनच घेत नाही. माझ्या इछा, अपेक्षांची कदरच करत नाही. नवरा बायकोच्या नात्यामध्ये दोघांनीही समान हातभार लावणं गरजेचं असतं.



फक्त एक बाजू योग्य असून चालत नाही तर दोन्ही बाजूने नात्याचे समतोल ठेवावे लागते. असे न झाल्यास संसारात दुरावा निर्माण होतो. आपण नेहमी पुरुषांकडून पत्नीचा छळ झाल्याच्या घटना घडल्या आहेत. परंतु, मराठवाड्याच्या हिंगोली जिल्ह्यात पत्नीकडून पुरुषांचा छळ झाल्याच्या एक-दोन नव्हे तर तब्बल एकशे सत्तावीस तक्रारी दाखल झाल्या आहेत.

विवाहित महिलांचा जसा सासरी छळ होतो, तसाच छळ विवाहित पुरुषांचाही पत्नीकडून होत असल्याच्या तक्रारी येत आहेत. करोना काळात तर पती-पत्नीमधील सर्वाधिक वाद थेट पोलीस ठाण्यापर्यंत गेले होते. यात दिवसेंदिवस वाढच होत असून वर्षभरात तब्बल १२७ तक्रारी पुरुषांनी पत्नी विरोधात नोंदविल्या आहेत. संसारात पत्नीकडून जसा छळ होतो तसाच पत्नीकडूनही असल्याच्या तक्रारी आहेत.२०२२ मध्ये ९२ पुरुषांनी पत्नी विरोधी तक्रारी नोंदविल्या होत्या, तर २०२१ मध्ये १२७ पुरुषांनी पत्नी विरोधी तक्रारी नोंदविल्या आहेत.

यापेक्षाही छळ होत असल्याचे काहींचे म्हणणे आहे. पण लोक काय म्हणतील या भीतीने पोलीस ठाण्यात तक्रारी देण्यात पत्नीपीडित पती पुढे येत नाहीत. तरीही वर्षभरात तब्बल एकशे सत्तावीस पुरुषांच्या तक्रारी भरोसा सेल कडे आल्या आहेत. तुझा सेल मध्ये पत्नी पत्नीचे समुपदेशन करून संसार पुन्हा जुळवण्याचा प्रयत्न केला जातो.

या कारणावरून सर्वाधिक वाद...!

पत्नी विरोधात दिलेल्या तक्रारीत आहे म्हटले आहे की, पत्नीकडून मानसिक त्रास होणे, किरकोळ कारणावरून वाद घालने, पत्नी व्यवस्थित वागत नाही, वारंवार माहेरी जाते, संशय घेते. कशी कारणे पुरुषांनी पत्नी विरोधात नोंदविली आहेत. तसेच आर्थिक कारणावरून ही वाद होत आहेत. इतरांप्रमाणेच आपल्याकडेही सुख-सुविधा असायला हव्यात आर्थिक कारणांमुळे ही अपेक्षा पूर्ण होत नसल्याने अपेक्षांना तडा जाऊन वाद निर्माण होण्याचे प्रकार समोर येऊन घटस्फोटापर्यंत जात आहेत.

# कोल्हापुरात अस्वलाचा हल्ला



कोल्हापूर : चंदगड तालुक्यातील जंगमहट्टी येथील ग्रामपंचायतीचा पाणी पुरवठा कर्मचारी तानाजी माणू शेळके (वय वर्षे २७) या तरुणावर अस्वलाने हल्ला करून गंभीर जखमी केलं आहे.

गायरानातील पाणी टाकीत किती पाणी उपलब्ध आहे हे पाहण्यासाठी शेळके मंगळवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास गेले असता अचानक अस्वलाने त्यांच्यावर हल्ला केला.

हल्ल्यात शेळके यांच्या डाव्या खांद्याला नखांचे ओरखडे व जखमा झाल्या आहेत. त्यानंतर प्रसंगावधान राखत शेळके चपळाईने काजुच्या झाडावर चढले, त्यामुळे मोठा अनर्थ टळला. तरीही अस्वलाने तीनवेळा येऊन शेळके यांच्यावर हल्ला केला. पण शेळके यांनी बचाव केला. अस्वलाने चिडून झाडांची साल ओरखडून चावली आहे. शेळके यांनी आरडाओरडा करत मदतीसाठी गावकऱ्यांना बोलण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने अस्वल निघून गेले. आरडाओरड ऐकून काही गावकरी झाडाजवळ आले. त्यांनी शेळके यांना झाडाखाली उतरवले. तसंच अस्वल परत येऊ नये म्हणून झाडाखाली पालापाचोळा पेटवून दिला.

या घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. वनविभागाच्या गाडीने तानाजी शेळके यांना ग्रामीण रुग्णालय चंदगड येथे उपचारास दाखल केले. सध्या त्यांची प्रकृती स्थिर आहे. याकामी वनक्षेत्रपाल दत्ता पाटील, वनपाल बी.आर.भांडकोळी, वनपाल एन.एम. धामणकर, वनरक्षक प्रकाश शिंदे, मेघराज हुल्ले, डी.एस रावळेवाड, वनमजूर नारायण गावडे, पी.एन.नागुर्डेकर, विश्वनाथ नार्वेकर उपस्थित होते.

दरम्यान, वनक्षेत्रात गुरे चारायला जाताना किंवा वनक्षेत्रानजीक शेतात वावरताना स्थानिकांनी खबरदारी घ्यावी, असं आवाहन वनक्षेत्रपाल पाटील यांनी केलं आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्क:-9594418181 / 8424989898